२०२००९१४१२१३२६३३१७

खाजगी/विश्वस्त रक्तपेढ्यांसाठी प्लाझमा अफेरॅसिस पध्दतीने संकलित केलेल्या प्लाझमा पिशवीचे दर निश्चित करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग

गो. ते. रुग्णालय संकुल इमारत,

१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.३१७/आरोग्य ५

दिनांक : २४ सप्टेंबर, २०२०

<u>संदर्भ :</u>

१) साथरोग कायदा, १८९७.

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५.

३) औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४०

४) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या मार्गदर्शक सूचना पत्र क्र. एस-१२०१६/०१/२०१२- नॅकोएनबीटीसी, दिनांक १२.०२.२०१४.

५) शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. াররসে-२०१३/प्र.क्र.२२४/आरोग्य-५, दिनांक २५.०६.२०१४.

६) केंद्र शासनाचे क्र. X ११०/२६/१७९/२०२०-BD (Director General of Health Services, Central Drug Standard Control Organization), दिनांक ०१.०७.२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचना.

<u>प्रस्तावना</u> :-

केंद्र शासनाच्या महासंचालक, आरोग्य सेवा अंतर्गत सेंट्रल ड्रग स्टॅंडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन यांच्या संदर्भ क्र. ६ येथे नमूद दि. ०१.०७.२०२० च्या पत्रानुसार कोविड-१९ बाधीत रुग्णांच्या उपचार पध्दतीमध्ये प्लाझ्मा थेरेपी वापरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना नमूद आहेत. त्यानूसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दि.२९.०६.२०२० च्या शासन परिपत्रकानूसार राज्यात कोविड-१९ बाधीतांवर केंद्र शासनाच्या दि.१३.०६.२०२० च्या क्लीनिकल मॅनेजमेंट प्रोटोकॉल मधील मार्गदर्शक सूचनांनूसार Convalescent Plasma (off label) उपचार पध्दती वापरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

२. राज्यात सद्य:स्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कोविड बाधीत रुग्णांवर ट्रायल बेसिसवर निशुल्क प्लाझ्मा थेरेपी उपचार पध्दती वापरण्यात येत आहे. केंद्र शासन व सेंट्रल ड्रग स्टॅंडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशने ऑफ लेबल प्लाझ्मा थेरेपी वापरण्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्यानंतर प्लाझ्माफेरॅसिस पध्दतीने संकलित करण्यात आलेल्या Convalescent Plasma (off label) वापरण्यासाठी खाजगी व विश्वस्त रक्तपेढ्यांकडून प्लाझ्मा थेरपेसाठी आवश्यक प्लाझ्मा बॅगसाठी अवाजवी शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आले. या दरात राज्यात एकसुत्रता असणे व रुग्णांना किफायतशीर दरात Convalescent Plasma (off label) उपलब्ध करुन देणे यासाठी या प्लाझ्माचा प्रती डोसची किंमत निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. राज्यात इतर कोविड बाधीत रुग्णांना प्लाझ्मा थेरपीने उपचारासाठी प्लाझ्माफेरॅसिस पध्दतीने संकलित करण्यात आलेल्या Convalescent Plasma (off label) किफायतशीर किंमतीत उपलब्ध होण्यासाठी राज्य रक्त संक्रमण परिषदे मार्फत तज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने प्लाझ्मा अफेरॅसिस पध्दतीने प्लाझ्मा संकलित करण्यासाठी लागणारे कन्झ्युमेबलचा खर्च व राष्ट्रीय रक्त धोरणानुसार निश्चित केलेलल्या रक्तावरील अतिरिक्त चाचण्या / विशेष चाचण्या यासाठी आकरण्यात

येणाऱ्या सेवा शुल्काबाबत निर्गमित झालेले शासन परिपत्रक क्र.रारसे-२०१३/प्र.क्र.२२४/आ-५, दि.२५.०६.२०१४ नुसार करण्यात आलेली दर निश्चिती विचारात घेतलेली आहे.

उक्त सर्व बाबी लक्षात घेऊन, शासन आता खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१) कोविड बाधीत रुग्णांवर प्लाझ्मा थेरेपीद्वारे उपचार करण्यासाठी प्लाझ्मा अफेरॅसिस पध्दतीने संकलित केलेल्या प्रति डोस प्लाझ्मा बॅगसाठी (२०० मि.ली. प्लाझ्मा) खाजगी / विश्वस्त रक्तपेढयांना / रुग्णालयांना रुग्णाकडून रु. ५५००/- इतका कमाल दर (सर्व करांसहित) आकारण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२) NAT चाचणीसह प्लाझ्मा बॅग उपलब्ध करुन दिल्यास, या चाचणीसाठी कमाल दर रु. १२००/- प्रति चाचणी (सर्व करांसहित) (प्लाझ्मा बॅग किंमतीव्यतिरक्त) तर केमील्युमीनेसन्स तपासणी करुन प्लाझ्मा बॅग दिल्यास या चाचणीसाठी प्रति चाचणी कमाल रु. ५००/- (सर्व करांसहित) (प्लाझ्मा बॅग किंमतीव्यतिरक्त) दर आकारण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

३) खाजगी किंवा विश्वस्त रक्तपेढ्यांनी अ.क्र १ व २ मध्ये नमूद दरापेक्षा अधिक दर आकारल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांनी आकारलेल्या अतिरिक्त रक्कमेची परतफेड संबधित रुग्णांना करणे अनिवार्य राहील, अन्यथा, संदर्भाधीन कायद्यातील तरतुदींन्वये संबंधित रक्त पेढीचा परवाना रद्द करण्याबाबतची कारवाई संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२००९१४१२१३२६३३१७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( किरण वाहूल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव,प्रशासकीय विभाग मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बांद्रा, मुंबई.
७) जिल्हाधिकारी (सर्व).
८) महानगरपालिका आयुक्त (सर्व).
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई.
११) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व पुणे.
१२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१३) संचालक/सहायक संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
१४) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व).
१५) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
१६) निवड नस्ती (आरोग्य-५)

प्रत माहितीस्तव

१) मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.